स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 06–05–2015** रोजी **सायंकाळी 04–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. प्रमोद भुसारी, अति. उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 38:— मौजा–नरसाळा या भागातील माऊल जनरल स्टोअर्स ते इंद्रा नगर, ब्रम्हा नगर येथे भुमिगत नाली व रस्त्याचे खडीकरणाच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. न्यु विराज कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 27.86 टक्के कमी दराची रू. 41,84,578/– रकमेची निम्नतम निविदा निविदा स्विकृत तसेच सन 2015–16 चे अर्थसंकल्पातून पद क्र. A42001374602 मधून तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 39</u>:— मौजा—नरसाळा बजरंग किराणा स्टोर्स ते नंदनवार स्वागत नगर येथे भुमिगत नाली व रस्त्याचे खडीकरणाच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. विनोद एम. मडावी यांची प्राकलनीय दरापेक्षा 32. 18 टक्के दराची रू. 25,86,447/— रकमेची निम्नतम निविदा निविदा स्विकृत करणे तसेच सन 2015—16 चे अर्थसंकल्पातून पद क्र. A42001374602 मधून तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्राकलनीय दरापेक्षा 32.18 टक्के कमी दराच्या रु. 25,86,447/— रकमेची या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 40</u>:— मौजा—नरसाळा बेसा पावर हाऊस रोड ते मोरया लॉन ते गोविंद नगर, श्री. चोपडे ते श्री. कोकाटे ते श्री. मेश्राम यांचे घरापर्यंत प्रथम चरण रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त निविदापैकी मे. न्यु विराज कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 27.86 टक्के कमी दराची रू. 63,78,770/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत तसेच सन 2015—16 चे अर्थसंकल्पातून पद क्र. A42001374602 मधून तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 41</u>:— नागपूर शहर मंजूर विकास आराखडया नुसार DP रोड EP/68 मॉरीस कॉलेज टी पॉईन्ट ते इन्स्टिटयुट ऑफ सायन्स कॉलेज/नागपूर विद्यापीठ पर्यंत 18 मिटर रूंदीच्या रस्त्याच्या विकासाकरीता निविदा प्राप्त न झाल्याने तसेच रस्त्याकरीता आवश्यक 7914.993 चौ मिटर जागेचा अगाऊ ताबा मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे कडून 21.02.2015 ला मिळाला असल्या कारणाने Physical Possession घेण्याकरीता (1) रस्त्याचे संरेखाणा मध्ये येणाऱ्या जून्या सरंक्षण भिंती तोडून, नविन सरंक्षण भिंती बांधण्याकरीता, (2) जूना पूल तोडून नविन पूल बांधण्याकरीता व (3) फुटपाथ, ड्रेन सह रस्त्याचे नविन बांधकाम करण्याकरीता वेगळया निविदा मागविण्याचे परवानगी करीताचा प्रस्ताव मंजूरी चा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 42</u>:— जलप्रदाय विभागाच्या दहा झोनमध्ये जलवाहीन्यांच्या गळत्या दुरूस्ती व सुस्थितीच्या कामाच्या वार्षिक कंत्राटासंदर्भात खालील नमूद प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

१. दि. ०६.१०.२०१० ते २८.०२.२०१२ मध्ये केलेल्या कामास दि. २८.०२.२०१२ पावेतो कार्योत्तर मुदतवाढ व मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
२. या कामाकरीता खालील तक्त्यात नमूद झोननिहाय अतिरिक्त खर्च एकूण रू. १०१६९४१८/— खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| झोन क्र./नांव | कार्यरत एजेन्सीज् | दि. ०६.१०.२०१० ते दि. २८.०२.२०१२ पर्यंत झालेल्या अतिरिक्त खर्चाची रक्कम |
|---|---|---|
| १ लक्ष्मीनगर | मे. एच. जे. जीभकाटे | २८१४५० |
| | एस. आर. कन्स्ट्रक्शन | |
| | मे. दिपक तेलंग | |
| | मे. ओ. आर. प्रसाद | |
| | व्ही.जी. एंटरप्रायजेस | |
| २ धरमपेठ | मे. सागर ट्रेडींग कंपनी | ६९८१६३ |
| | मे. ए. आर. सिंग | |
| | मे. रोहन कन्स्ट्रक्शन | |
| ३ हनुमाननगर | मे. जी.एस. पात्रा | १०८१०२९ |
| | मे. दिपक तेलंग | |
| | मे. ए. आर. सिंग | |
| ४ धंतोली | मे. जी.एस. पात्रा | ८२५५८८ |
| | मे. ओ. आर. प्रसाद | |
| ५ नेहरूनगर | मे. जी.एस. पात्रा | १८७०६८१ |
| | मे. एच. जे. जीभकाटे | |
| | मे. रोहन कन्स्ट्रक्शन | |
| ७ सतरंजीपुरा | मे. एच. जे. जीभकाटे | २४०७४६६ |
| | मे. श्री. जी. इंजिनिअरींग | |
| | मे. पंकज दडवे | |
| ८ लकडगंज | मे. पंकज दडवे | ६२०६२२ |
| | मे. व्ही.जी. एंटरप्रायजेस | |
| | मे. ए. आर. सिंग | |
| ९ आशिनगर | मे. एच. जे. जीभकाटे | २३८४४१९ |
| | मे. एस. व्ही. आसोले | |
| | मे. ए. आर. सिंग | |
| | मे. व्ही.जी. एंटरप्रायजेस | |
| एकूण | | १०१६९४१८/— |

३. या कामावरील एकूण (रू. २८३४२००० + रू. १०१६९४१८) रू. ३८५११४१८/— च्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 43</u>:— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 137(1) मधील तरतुदीला अनुसरून नागपूर शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरेंन्ट, मंगल कार्यालये लॉन्स व हॉस्पीटल्स या मालमत्तांवर खालील नमुद दराने वार्षिक विशेष सफाई कर आकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अनु. क्र. | विभागाद्वारे प्रस्तावित | | कर आकारणी व कर संकलन समितीद्वारे प्रस्तावित | |
|---|---|---|---|---|
| 1) | रू. 5001 व त्यापेक्षा अधिक | रू. 2000 किंवा वार्षिक भाडे मुल्याच्या 15 टक्के यापैकी जी रक्कम जास्त आहे. | रू. 50000 पावेतो | सात टक्के |
| 2) | | | रू. 50001 व त्यापेक्षा जास्त | दहा टक्के |

<u>ठराव क्रमांक 44</u>:— नागपूर महानगरपालिका नियंत्रण कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे तसेच मंजुर रेखाचित्रापेक्षा जास्तीची बांधकामे केलेली प्रकरणे , प्रशमन शुल्क आकारुन नियमीत करण्याकरीता खालील निर्धारित धोरणांस व प्रस्तावीत प्रशमन शुल्क आकारण्यास तसेच अस्तीत्वातील अनधीकृत बांधकामांना उपरोक्त नमूद प्रशमन धोरणांतर्गत मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार सहाय्यक संचालक , नगर रचना , म.न.पा. यांना प्रत्यायोजीत करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ज्याअर्थी स्थायी समिती ठराव क्र. 25 दि. 10.04.2015 स्थायी समितीद्वारे मंजूर करण्यात आला त्याअर्थी प्रशासनाने त्या ठरावाचे कार्यान्वीकरण करुन तसे परिपत्रक निर्गमित करावयास पाहीजे होते. परंतू या एक महीन्याच्या कालावधीत प्रशासनाने या ठरावाची अंमलबजावणी केली नाही. प्रशासनाच्या या कार्य पध्दतीवर ही स्थायी समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

या ठरावात स्थायी समितीने प्रशासनास स्पष्ट निर्देशीत व सुचित केले होते की, विविध शुल्का मध्ये दर वाढ करावयाची असल्यास रितसर प्रस्ताव स्थायी समिती मार्फत सभागृहासमोर 15 दिवसाचे आत सादर करावा. परंतू अद्याप पर्यंत असा प्रस्ताव स्थायी समिती समोर प्रशासनाने पाठविला नाही.

यापूर्वी प्रशासनाने इमारत बांधकाम व अभिन्यास मंजूरी प्राप्त करण्यासंबंधी आकारण्यात येणारे विविध शुल्क शिघ्र गणक मधील जमिनीच्या दरावर आकारण्यात आले आहे व सद्या स्थायी समिती कडे जो प्रशमन शुल्क आकरण्या संदर्भात जो प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तो शिघ्र गणक मधील बांधकाम दरावर आकारण्यात आले आहे.

या दोन्ही तफावत आहे व दोन्ही दर तर्कसंगत नाही. असे स्थायी समितीचे मत झाले आहे. ही बाब प्रशासनाच्या लक्षात आली नाही का ? हा प्रश्न स्थायी समितीला पडला आहे.

ठराव क्र. 246 दि. 05.07.2008 हा महासभेद्वारे मंजूर करण्यात आला होता व तो बांधकामाचे दरावर आकारण्यात आला होता तो तर्कसंगत होता. या ठरावात दर तीन वर्षांनी 10 टक्के दरवाढ प्रस्तावित केली होती. त्या प्रमाणे विभागाने दरवाढ केली होती असे दिसुन येते.

सर्व परिस्थितीचा विचार करता, विभागास जो 15 दिवसात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश या स्थायी समितीने दिले होते, त्याची योग्य दखल विभागाद्वारे घेतली नाही. त्यामुळे इमारत बांधकाम व अभिन्यास मंजूरी प्राप्त करण्यासंबंधी भरावयाचे विविध शुल्क आकारण्याचे दर व प्रशमन शुल्क आकारण्याचे दरातील तफावत दुर करण्याच्या दृष्टीने व हे सर्व दर तर्कसंगत असावे असे स्थायी समितीचे मत झाले आहे.

त्यामुळे ठराव क्र. 246 दि. 02.07.2008 चा आधार गृहीत धरुन, इमारत बांधकाम व अभिन्यास मंजूरी प्राप्त करण्यासबंधी भरावयाचे विविध शुल्कात व प्रशमन शुल्कात योग्य ती घट व वाढ तसेच फेरबदल करण्याचे संपूर्ण अधिकार सभापती, स्थायी समिती यांना देण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच उपरोक्त प्रस्ताव प्रस्तावित अर्थसंकल्पाद्वारे म.न.पा. सभागृहासमोर मंजूरी करिता सादर करण्याचे अधिकार ही स्थायी समिती सभापती, स्थायी समिती यांना देण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

तसेच ही स्थायी समिती असेही निर्देश देते की, स्थाीय समिती ठराव क्र. 25 दि. 10.04.2015 चे सात दिवसाचे आंत कार्यान्वीकरण करुन दरावर दिलेल्या स्थगिती बाबत संबंधित विभागास परिपत्रकाद्वारे सुचित करावे असा एकमताने निर्णय घेतला.

अनाधिकृत बांधकाम प्रशमन शुल्क आकारून नियमित करण्याची मार्गदर्शक तत्वे व सुधारीत **दर**

अ ) 10.00 मी. उंची पर्यंतच्या निवासी व वाणिज्य इमारती करिता :—

| अ. क्र. | तपशिल | प्रशमन शुल्क (विद्यमान दराप्रमाणे) | | प्रशमन शुल्क (नवीन दराप्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| | | **निवासी** | **वाणिज्य** | **निवासी** | **वाणिज्य** |
| 1. | बाजुच्या व मागील आवश्यक सामासिक अंतरातील 50 टक्के पर्यंत सामासिक अंतराचे उल्लंघन (गैरदाटीवाटीच्या क्षेत्रात 1.5 मी. पेक्षा कमी आणि दाटीवाटीच्या क्षेत्रात 0.75 मी पेक्षा कमी समासिक अंतर असता कामा नये. लगतच्या मालकाच्या संमतीने स्पर्श बांधकाम किंवा सामायिक भिंतीचे बांधकाम नियमित करण्यास पात्र राहतील.) | 1380.00 | 2100.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट—अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ. मी. बिल्ट—अप एरिया प्रमाणे |
| 2. | समोरील सामासिक अंतरात 0.60 मी. पर्यंतचे सामासिक अंतराचे उल्लंघन (राष्ट्रीय व राज्य महामार्ग तसेच दाटीवाटीच्या क्षेत्रात 2.00 मी. पेक्षा कमी सोडलेले अंतरा व्यतिरिक्त) | 1380.00 | 2100.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट—अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ. मी. बिल्ट—अप एरिया प्रमाणे |

**ब) 10.00 मी. चे वर आणि 14.99 मी. उंची पर्यंत असलेल्या निवासी व वाणिज्य वापराच्या इमारती करिता :—**

| अ. कं. | तपशिल | प्रशमन शुल्क ( विद्यमान दराप्रमाणे) | | प्रशमन शुल्क (नवीन दराप्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | वाणिज्य | निवासी | वाणिज्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बाजुच्या व मागील आवश्यक सामासीक अंतरातील 33 टक्के पर्यंत सामासिकअंतराचे उल्लंघन | 1380.00 | 2100.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| 2. | समोरील सामासिक अंतरात 0.60 मी. पर्यंतचे सामासिक अंतराचे उल्लंघन (राष्ट्रीय व राज्य महामार्ग तसेच दाटीवाटीच्या क्षेत्रात 2.00 मी. पेक्षा कमी सोडलेले अंतरा व्यतिरिक्त) | 1380.00 | 2100.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |

क ) 15.00 मी. आणि त्यावरील निवासी व वाणिज्य इमारती आणि सार्वजनिक/निमसार्वजनिक , शैक्षणिक, संस्थीय इमारती करिता. (अग्निशमन विभाग, म.न.पा. चे ना–हरकत प्रमाणपत्राचे अटीवर)

| अ. क्र. | तपशिल | प्रशमन शुल्क ( विद्यमान दराप्रमाणे) | | प्रशमन शुल्क (नवीन दराप्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | वाणिज्य | निवासी | वाणिज्य |
| 1. | बाजुच्या व मागील आवश्यक सामासिक अंतरातील 25 टक्के पर्यंत सामासिक अंतराचे उल्लंघन | 1380.00 | 2100.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| 2. | समोरील सामासिक अंतरात 0.60 मी. पर्यंतचे सामासिक अंतराचे उल्लंघन (राष्ट्रीय व राज्य महामार्ग तसेच दाटीवाटीच्या क्षेत्रात 2.00 मी. पेक्षा कमी सोडलेले अंतरा व्यतिरिक्त) | 1380.00 | 2100.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |

**(ड) सर्व इमारतींचे सामान्य नियमितीकरण :–**

| अ. क्रं. | तपशिल | प्रशमन शुल्क (विद्यमान दराप्रमाणे) | | प्रशमन शुल्क (नवीन दराप्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | वाणिज्य | निवासी | वाणिज्य |
| 1. | अतिरिक्त बाल्कनीचे बांधकाम (एकूण बाल्कनीचा एरीया त्या मजल्याच्या बिल्टअप क्षेत्राच्या 20 टक्के पेक्षा जास्त नसावा आणि ती बाल्कनी गैर दाटीवाटीच्या क्षेत्रात जागेच्या हद्दीपासून 1.50 मी. पेक्षा सामासीक अंतर कमी करणारे नसावे.) | 1380.00 | 2100.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| 2. | तळघरातील बांधकाम दुकानांकरिता वापरणे (जर ते चटई क्षेत्र निर्देशांकात समाविष्ठ असल्यास आणि निवासी वापर सोडून)<br>टिप :– वाहनतळाच्या जागेत आणि विकास नियंत्रण नियमाप्रमाणे इतर | ....... | 1380.00 | ....... | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सुविधाच्या (ॲमेनिटीज) जागेवर मान्य होणार नाही. | | | | |
| 3. | अ) बाह्य भागातील पुर्ण खिडकी किंवा पुर्ण काचांचे शटर लावून बाल्कनीचे क्षेत्र खोलीमध्ये समाविष्ट करणे. | 1080.00 | 1680.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |

| अ. क्रं. | तपशिल | प्रशमन शुल्क (विद्यमान दराप्रमाणे) | | प्रशमन शुल्क (नवीन दराप्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | वाणिज्य | निवासी | वाणिज्य |
| 1. | प्रचलित विकास नियंत्रण नियम लागु होण्यापुर्वीचे बांधकाम :– विकास नियंत्रण नियमाप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांकातून सुट देणे अनुज्ञेय असलेले जिना, पॅसेजेस इ. चे बांधकाम चटई क्षेत्र निर्देशांकामधुन सुट देणे मान्य करणे. (मंजूर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे जास्तीत जास्त 30 टक्के मर्यादेच्या अटीवर आणि मंजूरी पेक्षा अतिरिक्त माळयाचे बांधकाम या तरतुदीचे आधारे नियमितीकरणास पात्र राहणार नाही.) | 1200.00 | 2400.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| 2. | पोर्च, कॅनोपीचे अतिरिक्त बांधकाम प्रति चौ.मी. | 1080.00 | 1680.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 10% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 15% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| 3. | नागपूर महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय बांधकाम केलेले किंवा नागपूर महानगरपालिकेच्या परवानगी विरूध्द केलेले बांधकाम मंजूर करणे (नियमाप्रमाणे असलेले) | 24.00 | 60.00 | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 1% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 2% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| 4 | कुंपन भिंतीचे अतिरिक्त उंचीचे बांधकाम नियमित करणे (त्या किंवा संलग्न इमारतीची प्रकाश व वायुविजनाची व्यवस्था प्रभावित होत नसेल तरच) | Per .mt. 90.00 | Per .mt. 120.00 | Per .mt. 90.00 | Per .mt. 120.00 |
| 5 | इमारत /फ्लोअरची उंची वाढवील्याबाबत शिथीलता प्रदान करणे आवश्यक असल्यास त्यासाठीचे दर ( पुर्व परवानगी न घेता केलेले बांधकामासाठी ) | – | – | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 50% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | शिघ्र सिध्द गणक (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 75% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| | | | | शिघ्र सिध्द गणक | शिघ्र सिध्द गणक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | जोते तपासनी दाखला न घेता केलेल्या बांधकामास (नियमित होत असल्यास ) | — | — | (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 5% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे | (Ready Reckoner) मधील बांधकाम दराचे 10% प्रती चौ.मी. बिल्ट–अप एरिया प्रमाणे |
| 7 | भोगवटा पत्र मिळण्यासाठी वैयक्तिक अर्ज करणा–या नागरिकांस ा. | — | — | अ) 650 चौ.फुट कारपेट क्षेत्रापर्यंत – एकरकमी रु.10000/– ब) 650 ते 1000 चौ.फुट कारपेट क्षेत्रापर्यंत – एकरकमी रु. 15000/– क) 1000 चौ.फुट पुढील कारपेट क्षेत्रासाठी – एक रकमी रु.20000/– | |

**(इ) औद्योगिक इमारतींचे नियमीतीकरण**

निवासी इमारतीं करीता आकारण्यात येणा–या वरील प्रमाणे शुल्काच्या 1.50 पट शुल्क आकारुन औद्योगिक इमारतींचे बांधकाम नियमीत करता येईल. तसेच संस्थीय वापराच्या इमारतींचे बांधकाम नियीमतीकरण निवासी इमारतीं करीता आकारण्यात येणारे आकारुन करता येईल .

<u>ठराव क्रमांक 45</u>:— स्थायी समिती ठराव कमांक 116 दिनांक 5/11/2011 अन्वये महाल रोग निदान केंद्रा अंतर्गत डायलेसीसची सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी सिरोनिगेटिव्ह रूग्णाकरीता प्रति रूग्ण रू. 1000/— यापैकी म.न.पा. आरोग्य विभागातर्फे रू.500/— व उर्वरित रू.500/— रूग्ण स्वतः देईल. तसेच सिरोपॉजीटिव्ह रूग्णाकरीता प्रति रूग्ण रू.1200/— यापैकी म.न.पा. आरोग्य विभागातर्फे रू.600/— व उर्वरित रू.600/— रूग्ण स्वतः देईल. या दरावर अश्विनी किडनी व डायलिसीस सेंटर, रामदासपेठ नागपूर येथे डायलिसीस सेवा सुरू आहे. नागपूर शहरात पी.पी.पी. तत्वावर जुन्याच अटी व शर्ती नुसार, अतिरिक्त डायलिसीस केंद्र श्रवण हॉस्पीटल व किडनी इंस्ट्टियुट, नंदनवन नागपूर येथे सुरू करण्याचे प्रस्तावित आहे, सदर प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री.किशोर डोरलेः— मा. सभापती, टॅक्स असेसमेंटच्या खुप केसेस पेडिंग पडलेल्या आहेत त्यावर टॅक्स लागलेला नाही, ते केव्हा करणार आहे. टॅक्स लावण्यासाठी काय अडचण येत आहे. मार्च महिना निघून गेला आणि आता मे महिना चालू झाला आहे. महापालिकेला पैश्याची अडचण आहे अशावेळी लवकरात लवकर उत्पन्न वाढविण्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. झोनमध्ये आपण सांगत आहे की त्यांना टॅक्स लावू शकत नाही.

श्री.हस्तक(अधिक्षक अभियंता):— मा. सभापती, महापालिका सभागृहाने कर आकारणीची नवीन पध्दत मंजूर केली आहे त्यात संगणक प्रणालीने टॅक्स आकारणीचे काम करून घ्यायचे आहे. संगणक प्रणालीमध्ये काही त्रुटी असल्यामुळे त्यात सुधारणा करून घेण्यासाठी आपण एजन्सीला दिले आहे. ते टेक्निकल काम असल्यामुळे त्याला दोन अडीच महिन्याचा वेळ लागेल असे त्यांनी आयुक्तांना कळविले आहे. तोपर्यंत असा निर्णय घेत आहे की कर आकारणीचे जे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते जुन्या प्रणालीनुसार करून त्यानंतर सॉफ्टवेअर मॉडिफाईड झाल्यानंतर प्रोसिजर ऑफ असेसमेंटमध्ये जी फरकाची रक्कम राहील त्यासाठी

नोटीस देवून जास्त रक्कम घेतली असेल तर कमी करून आणि कमी असेल तर वसुल करून याप्रमाणे करणार आहे. झोन कार्यालयाला आम्ही याबाबतचे पत्र सर्क्युलेट केले आहे. या आठवडयापासून काम सुरू करण्यात येईल.

सभापतीः—मा.सदस्य बालपांडे यांनी मागच्या वेळेस 50 टक्क्याच्या हजार पेक्षा जास्त केसेस आपल्या कार्यालयातर्फे आपण रेट कमी जास्त करतो याची माहिती मागितली होती. कोणत्याही झोनला अजूनपर्यंत माहिती आलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

श्री.हस्तक(अधिक्षक अभियंता):— मा. सभापती, सहा.आयुक्तांना या संदर्भात पत्र दिले होते. 4 झोनच्या फाईल आलेल्या आहेत.

सभापतीः— पुर्ण झोनच्या फाईली मागविण्यात याव्यात. अशा प्रकरणांचा सखोल अभ्यास करता येईल.

श्री.कामील अंसारीः— मा.सभापती महोदय, मेरे प्रभाग मे हाजी अब्दुल मजीद लीडर प्रायमरी हायस्कुल है । वहा पर पहले तीन चौकीदार थे, उसमे से दो चौकीदार को हटा दिया गया है । अब वहा पर एक चौकीदार है । जिसकी वजह से वहा कभी भी रात के समय दुर्घटना हो सकती है । स्कुल मे कम्पुटर और किमती चीजे है, इसलिये वहा रात को चौकीदार देना चाहिये । 27 तारीख मै ने शिक्षणाधिकारी इस संदर्भ मे पत्र दिया मगर उस की अंमलबजावणी हुई नही है ।

सभापतीः—अधिकारी वर्ग, आताच मा.सदस्य श्री.कामील अंसारी यांनी प्रश्न उपस्थित केला. यापूर्वी नागपूर शहरात महापालिकेच्या शाळा, विभागासाठी जे काही चौकीदार, गार्ड ठेवत होतो त्याची काय परिस्थिती आहे.

श्री.धामेचा(सहा.आयुक्त):—मा. सभापती, आपण महापालिकेच्या विविध विभागांना सुरक्षा गार्ड दिलेला आहे. 8 खाजगी आणि मेस्को अशा 9 एजन्सी कार्यरत आहेत. 425 सुरक्षा रक्षक महापालिकेत कार्यरत आहेत.

सभापतीः— कोणकोणत्या विभागात आहेत याची माहिती गोळा करून देण्यात यावी. मागे कॅफो साहेबांचे सुध्दा पत्र आले होते की खर्चात काटकसर करण्यात यावी. त्यांना आम्हांला सहकार्य करायचे असल्यास कोणकोणत्या विभागाकरिता वाहने लावण्यात आली आहेत. त्याच्यावर किती खर्च होत आहे. कुठे जास्त गाडया आहेत याची संपुर्ण विभागातून माहिती घेवून देण्यात यावी आणि मा.सदस्यांनी

सांगितल्याप्रमाणे त्या शाळेला चौकीदार नसेल तर चौकीदाराची व्यवस्था करण्यात यावी. पुढच्या बैठकीत याची संपुर्ण माहिती देण्यात यावी.

श्री.किशोर डोरलेः—मा.सभापती, महापालिकेत ई—गर्व्हनस्मध्ये टेंडर फायनल झाल्यानंतर कागदपत्रे मागण्यात येतात. इस के बाद भी ई—गर्व्हनस्मध्ये टेंडर मे कुछ कागद कम रहे तो बुला कर लेना चाहिये ।

सभापतीः—ई—गर्व्हनस्मध्ये चुकीचे काही होत आहे काय?

श्री.गायकवाड(नगरयंत्री):— मा.सभापती, जे 3 ई—टेंडर आले होते त्यात टेंडर डाक्युमेंट परिपुर्ण आहे. टेंडर कॉलींग ॲथारिटीला काही कागदपत्रे पाहिजे असल्यास टेंडर कॉलींग ॲथारिटी कागदपत्रे मागू शकते, हा त्यांचा अधिकार असतो.

श्री.किशोर डोरलेः—मा.सभापती, सर्वच ठिकाणी मागितले पाहिजे.

श्री.उराडे(कार्यकारी अभियंता):—मा.सभापती, 3 टेंडर आले होते त्या संदर्भात माहिती विचारत आहे. जे काही टेंडर 50 हजार, 1 लक्ष वा 1 कोटी असोत ते ग्लोबल स्तरावर टेंडर येत असतात. एखाद्या पर्टीक्युलर टेंडरमध्ये काही ना काही डिफरन्स होता. आम्ही एक चॉन्स घेतला. ॲथारिटीकडून डिसीजन प्राईज ब्रीड कसा कळविणार ते ऑब्जेक्शनमध्ये येवू शकते. ऑब्जेक्शन अवॉईड करण्याकरिता ही स्टेप घेतली आहे. त्यांना एकदा चॉन्स दिला आणि एक आठवडयात डाक्युमेंट सबमीट करण्यात आले. काही डाक्युमेंट चायनीज भाषेत लिहिले होते त्यामुळे ते समजत नव्हते. त्यामुळे त्यांना सेपरेट करून त्यांना कागदपत्रे सबमीट करण्यास सांगितले आहे.

श्री.किशोर डोरलेः— मा. सभापती, चायनीज भाषेत लिहिले होते म्हणून कागदपत्रे मागितले असे म्हणत आहे. आज त्या टेंडर करिता मागितले ते 5 कोटीचे आहे. आपण येथे 100 कोटीचे टेंडर काढले त्याच्या कामाला अजूनही गती नाही. 100 कोटीचे टेंडर एका माणसाला द्यावयाचे. त्यामध्ये घपला झाला आहे, 50 कोटी त्या व्यक्तिला जास्त दिले आहे. महानगरपालिकेचे त्यामुळे 50 कोटीचे नुकसान केले. 5 कोटी करिता एक नियम तर 100 कोटीकरिता वेगळा काही नियम आहे काय? चायनीज भाषेमध्ये टेंडर आला तर ती भाषा माहीत असलेल्या व्यक्तिला विचारायला पाहिजे. ज्या स्पीडमध्ये काम व्हायला पाहिजे त्या स्पीडमध्ये काम होत नाही.

श्री.उराडे(कार्यकारी अभियंता):—मा.सभापती, ते सगळे ॲथारिटीवर डिपेन्ड राहते.

सभापती:— आपण नियमानुसार चालतो तर दोन्ही बाजू सेफ पाहिजे. 5 कोटीसाठी वेगळे नियम आणि 100 कोटीसाठी वेगळे नियम असे असू नये. दोन्हीकरिता समान नियम पाहिजे.

श्री.उराडे(कार्यकारी अभियंता):—मा.सभापती, वेगळे काही नियम नाही. पर्टिक्युलर त्या टेंडरकरिता झाले आहे.

सभापती:— यानंतर असे होवू नये.

श्री.उराडे(कार्यकारी अभियंता):—मा.सभापती, चायनीज भाषेत डाक्युमेंट असल्यामुळे समजायला कठीण होते म्हणून मागितले होते.

श्री.किशोर डोरले:— मा. सभापती, ज्या पध्दतीने कागदपत्रे मागितले तसे 50 लक्षाचे टेंडर नागपूर शहरामध्ये झाले असेल आणि कागदपत्रे कमी जास्त असेल तर त्यांचे कागदपत्रे घेण्यात यावे.

सभापती:— याच्यानंतर कोणत्याही गोष्टीची पुर्ण तपासणी करून एक कायदा सर्वांना सारखा ठेवायला पाहिजे.

श्री.उराडे(कार्यकारी अभियंता):—मा.सभापती, आपण ॲथारिटी आहो, आपण पब्लीकचा पैसा युझ करतो.

श्री.कामील अंसारी:—मा. सभापती महोदय, रेल्वे क्रासिंग के नाले की हेल्थ की ओर से साफसफाई हो गई । परंतु पी.डब्लू.डी. का काम पिछले पंधरा दिनो से बंद है, जिस के कारण आने जाने वाले लोगो को तकलीफ हो रही है ।

श्री.गायकवाड(नगरयंत्री):— मा.सभापती, त्याठिकाणी नाल्यामध्ये केरकचरा गेल्यामुळे नाला चोक झाला होता. चोकेजेस काढण्यासाठी बरेच प्रयत्न केले. साफसफाई करण्यासाठी स्लॅब तोडावी लागली. स्लॅबची फाईल बनविण्याकरिता सांगितली आहे. डायरेक्ट सॅग्शन करून काम करता येईल.

श्री.संदीप सहारे:— मा.सभापती, नागपूर शहरामध्ये जे मॉल आहेत तेथे पार्किंग वसुली केली जाते ते नियमानुसार आहे की नियमबाहय आहे याची माहिती देण्यात यावी. लाखो रूपये पार्किंगमधून वसुल केले जात आहे.

श्री.भुसारी(अति.उपायुक्त):— मा. सभापती, नगररचना विभागामार्फत पार्किंग उपलब्ध करून देण्यात येते. त्याच्याकरिता किती जागा लागते त्याचे नार्म्स ठरलेले आहे. डीसीआरमध्ये ते देतो. त्याचा विनियोग, किराया ते घेत आहे. या संदर्भात असे कुठलेही नार्म्स नगर रचना विभागाकडे नाही.

श्री.संदीप सहारेः— मा.सभापती, ते त्या पार्किंगमधून कमाई करून राहिले. त्याचा मोबदला महापालिकेला मिळाला पाहिजे.

सभापतीः— आपण त्याला परवानगी दिल्यावर त्यांनी मॉल बांधले. त्यांनी पार्किंगमधून पैसे कशाला घ्यावे. त्यांना तो अधिकार आहे काय? हा प्रश्न निश्चित विचार करण्यासारखा आहे. त्याच्यावर एक कमेटी बसवून नागपूर शहरातील मॉलची चौकशी करून पार्किंगमधून किती वसुली करतात. त्यातून आपल्याला बेनिफिट होत असेल तर चांगला रेव्हेन्यु होवू शकतो. एक चौकशी चांगल्या अधिका—याच्या खाली करू शकतो. त्यात दोन मा.सदस्यांना घेवून संपुर्ण मॉलची चौकशी करावी. अशाप्रकारे ज्या ज्या पार्किंगमध्ये पैसे वसुल केले जातात त्याची माहिती गोळा करावी.

श्री.किशोर गजभियेः— मा. सभापती, या संदर्भात आपण विभागाची आणि स्थायी समिती सदस्यांची एक समिती स्थापन करायला पाहिजे. समिती तयार करण्याचा अधिकार आम्ही तुम्हांला देतो.

श्री.किशोर डोरलेः— मा. सभापती, महाजन मार्केट, बर्डी तेथे किरायाने मकाने, दुकाने दिली आहे. तेथे किराया घेवून गाडया ठेवल्या जातात. बाजार विभाग कुणाकडे आहे.

सभापतीः—अनेक ठिकाणी अशी प्रकरणे आहेत. अलंकार टॉकीज येथे असलेल्या मॉलच्या आतमध्ये सुध्दा पार्किंगसाठी पैसे घेतले जातात.

श्री.पटेलः—मा.सभापती महोदय, इस विषय पर मेरा ओपिनियम डिफरंस है । क्योकी टॉकीज व मॉल यह प्रापर्टी प्रायव्हेट है, मॉलवालो ने अपने प्रिमाईसेस मे पार्किंग का ठेका दिया होगा। इसलिये वहा पर पार्किंग वसुल किया जाता है। यह पर मा.सदस्य डॉ.चांडक हॉस्पीटल के सामने की पार्किंग की बात कर रहे है, वहां पर महानगरपालिकाने ठेका दिया था।

श्री.संदीप सहारेः— मा. सभापती, पार्किंगमधून जी वसुली केली त्यातून महापालिकेला काहीही प्राप्त होत नाही.

सभापतीः—एक कमेटी बनवुन त्यामध्ये या विषयावर चर्चा करून शहानिशा करू आणि अशा प्रकारच्या पार्किंगवर आपण बंधन घालू.

श्रीमती सलामेः—मा. सभापती, ज्या पध्दतीने मॉलमधील पार्किंगमधून वसुली केली जात आहे त्याप्रमाणे आठवडी बाजारातून सुध्दा पार्किंगसाठी वसुली केली जाते. अनंतनगर येथे बाजार आहे त्या बाजारातून सुध्दा पार्किंगसाठी वसुली केली जाते. बाजारातील कच—याची साफसफाई करण्याचे काम महापालिकेमार्फत केले जाते मात्र पार्किंगमधून वसुली केली जाते.

सभापतीः—मागच्या वेळेस मुंबई महापालिकेचे एक पत्रक गणवीर साहेबांनी मला दाखविले होते. जे फुटपाथवर दुकाने, ठेले लावतात त्याकरिता महापालिकेने प्रायव्हेट ला दिले आहे. ते स्वःत वसुल करतात. दुकानदार स्वतःच्या खिश्यातून 200 रू. काढून देतात अशी व्यवस्था आपल्याकडे आहे काय?

डॉ.गणवीरः— मा.सभापती, बाजार विभागाने एक प्रस्ताव तयार केला होता. बाजारातून सफाई शुल्क वसुल करण्याच्या संदर्भात, तो प्रस्ताव कुठपर्यंत आला याची माहिती नाही.

अधिकारी(बाजार विभाग):— मा. सभापती, या अनुषंगाने एक प्रस्ताव तयार केला होता. अनधिकृत बाजार, दुकाने यांच्याकडून 10 रू. शुल्क वसुल करावयाचा. या प्रस्तावावर स्थायी समितीची मंजुरी झाली होती आणि महासभेत हा प्रस्ताव पाठविला होता. महासभेने सुध्दा या प्रस्तावाला मंजुरी दिली. तत्कालीन महापौर होते, तत्कालीन पोलीस आयुक्त होते. यांची चर्चा झाली होती. त्यांचे निर्देश होते 10 रू. अवैध बाजारातून वसुल केले जावू शकत नाही.

सभापतीः— संध्याकाळी अवैध चालणा—या बाजारातून महापालिका कचरा उचलते, त्यांची सेवा करते. मात्र अवैधरित्या बाजार लावून, फुटपाथवर हाथठेले लावून, कारमध्ये हॉटेल लावून त्यातून दिवसाला 10ते 15 हजार रूपये कमवीत असतात. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. या संदर्भात धोरण तयार करून शहरातील हॉटेलवाले, दुकाने यांच्यांवर अंकुश लावता आला पाहिजे. दंडात्मक कार्यवाही करता यावी यासाठी पॉलिसी तयार करण्यात यावी.

श्रीमती सलामेः— मा. सभापती, याकरिता रात्री पाहणी करण्यात यावी.

श्री.मेश्राम(सहा.आयुक्त):— मा. सभापती, राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2013 अंतर्गत जेवढे काही हॉकर्स् आहेत त्या लोकांचे रजिस्ट्रेशन करून त्यांच्याकडून

600 रू. पर मंथ साफसफाई चार्ज वसुल करावयाचा आहे. राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2013 अंतर्गत फेरीवाला व्याख्येअंतर्गत हे सुध्दा येत आहे.

सभापतीः— काही लोक रोजचे हाथठेले लावतात. संध्याकाळच्या वेळी हे लोक हजारो रूपये रोजचे कमवीत असतात. त्यांचे लहान धंदे दिसत नाही. आपल्या गाडयामध्ये हॉटेल सुरू करून ते व्यवसाय करून राहिले.

श्री.भुसारी(अति.उपायुक्त):— मा. सभापती, व्हेयीकल ॲक्टप्रमाणे त्याच्यात चेंजेंस करता येईल. ते याकरिता अप्लीकेबल नाही. अतिक्रमणाच्या कमेटीमध्ये आरटीओ सदस्य आहे. त्यांना निर्देश देण्यात आले आहे. व्हेयीकल फुड विक्रेत्यांवर व्हेयीकल ॲक्टप्रमाणे कार्यवाही करू.

<u>ठराव क्रमांक 46</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर